**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ**
**(नॅकद्वारा 'अ' मानांकन प्राप्त)**

**जनसंपर्क विभाग**

---

## विद्यापीठात व्हर्च्युअल सी-फोरद्वारे
## विविध मान्यवरांचे व्याख्यान संपन्न
## व्याख्यान ऐकण्यासाठी विद्यापीठ संकेतस्थळावर उपलब्ध

अमरावती -

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्यावतीने लॉकडाऊन काळात विद्यापीठाच्या व्हर्च्युअल सी-फोरद्वारे विविध मान्यवरांचे व्याख्यानमालेंतर्गत व्याख्याने आयोजित करण्यात आली असून ती व्याख्याने विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. कुलगुरू डॉ. मुरलीधर चांदेकर यांचे मार्गदर्शनाखाली ही व्याख्याने होत असून या आठवड्यात शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूरचे प्राणिशास्त्र विभागप्रमुख डॉ. मन्ने वेंकटा संथा कुमार यांचे 'रेशीम अळीचे संगोपन आणि निगा', हिसलॉप महाविद्यालय, नागपूर येथील इंग्रजी विभागाचे सहयोगी प्राध्यापक डॉ. प्रंतिक बॅनर्जी यांचे 'मायग्रंन्ट्स मायक्रोब्स, ट्रायव्हलींग बॉडीज अॅन्ड बॉर्डर इम्युनिटीज इन पॅन्डेमिक नॅरेटिव्हज', प्रताप महाविद्यालय, अमलनेर येथील इंग्रजीचे सहाय्यक प्राध्यापक प्रो. नितीन पाटील यांचे 'बिल्डींग ब्रिजेस : ह्युमॅनिटीज अॅन्ड दि पॅन्डेमिक', एस.बी.आय. कॅपिटल मार्केट्स लिमी. मुंबईचे सिनियर व्हाईस प्रेसिडेंट श्री आशिष साबळे यांचे 'गुंतवणूक : संपत्तीची सुरक्षितता, जोखीम आणि वृद्धी', कॉलेज ऑफ कम्युनिटी सायन्स, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी येथील अन्नशास्त्र व पोषण विभागाच्या विभागप्रमुख डॉ. आशा आर्य यांचे 'प्रतिकार शक्तीसाठी आरोग्यदायी जीवनशैली' व जेष्ठ शास्त्रज्ञ, संशोधक व विज्ञानलेखक डॉ. बाळ फोंडके यांचे 'समकालीन मराठी विज्ञानकथा' या विषयावर व्याख्याने संपन्न झालीत.

निवेदन व पाहुण्यांचा परिचय मराठी विभागप्रमुख तथा व्हर्च्युअल सी-फोरच्या समन्वयक डॉ. मोना चिमोटे, प्राणीशास्त्र विभागप्रमुख डॉ. हेमलता नांदुरकर, इंग्रजी विभागप्रमुख डॉ. संदिप जोशी, गृहविज्ञान विभागप्रमुख डॉ. मनिषा काळे व मराठी विभागातील प्राध्यापक डॉ. प्रणव कोलते यांनी करुन दिला.

वक्त्यांची व्याख्याने विद्यापीठाच्या www.sgbau.ac.in या संकेतस्थळावर व्हर्च्युअल सी-फोर अंतर्गत उपलब्ध असून त्याचा जास्तीतजास्त लाभ सर्वांनी घ्यावा, असे आवाहन विद्यापीठाच्यावतीने प्र-कुलगुरू तथा व्हर्च्युअल सी-फोरचे अध्यक्ष डॉ. राजेश जयपूरकर, कुलसचिव डॉ. तुषार देशमुख व व्हर्च्युअल सी-फोरच्या समन्वयक डॉ. मोना चिमोटे यांनी केले आहे.

---

प्रति, **जनसंपर्क विभाग**
मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी दि. २०/०७/२०२०.
दै............................... अमरावती.

मा. महोदय,

आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

**(डॉ. विलास नांदुरकर)**
जनसंपर्क अधिकारी